

# धक्का!!

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४ । पान १२

# भीमा पट्ट्यातील १७ गावांत कोणाला 'खतरा'?

कल्याण कुलकर्णी
पंढरपूर

**पंढरपूर तालुक्यातील मात्र भीमा सहकारी साखर कारखान्याच्या पट्ट्यामधील १७ गावांमध्ये लोकसभा निवणुकीचे वादळ मोठ्या प्रमाणावर घोंगावत आहे. अभिजित पाटील, प्रशांत परिचारक, धनंजय महाडिक आणि भगीरथ भालके या बड्या नेतेमंडळींचे गट या भागात आहे. लोकसभा निवडणुकीनं राजकीय वातावरण येथे चांगले तापले आहे. निवडणुकीचा प्रचारदेखील सुरु आहे. मात्र, विविध मुद्यांवरुन मतदारांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्यातून मतदार एका बाजूला आणि नेतेमंडळी दुसऱ्या बाजूला असं चित्र सध्या तरी आहे. यातून या भागात कोणत्या उमेदवाराला कौल मिळेल हे सांगता येणे अवघड बनले आहे. '१७ गावांत कोणाला कोणला खतरा' अशी चर्चा या भागात रंगली आहे. मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने राहिला? सत्ताधारी भाजपच्या विरोधात मतदारांनी राग काढला की महाविकास आघाडीच्या बाजूने समर्थन दिले, याचे उत्तर मतमोजणीमधून मिळणार आहे.**

सद्य परिस्थितीमध्ये नदीकाठी वीजपुरवठा खंडित आहे. नदी पाण्याने भरलेली असूनदेखील शेतकऱ्यांना उभ्या पिकांना नदीचे पाणी देता येत नाही. जिल्हाधिकारी यांच्या आदेशामुळे आठ तास लाइट देण्याऐवजी सध्या फक्त सहा तास लाइट दिली जाते. त्यामध्येही सहा तासातले दोन तास लाइट ही मिळत नाही. केवळ चार तासावरच शेतकऱ्यांना आपली उभी पिके वाचवताना मोठा प्रयत्न करावा लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये फार मोठी नाराजी आहे.

त्याचबरोबर सुजलाम् सुफलाम् असलेल्या या १७ गावांमध्ये कांदा उत्पादक शेतकरी देखील मोठ्या प्रमाणावर आहेत. कांदा निर्यात बंदीमुळे शेतकऱ्यांना त्यांचा कांदा हा कवडीमोल भावात विकल्यामुळे त्यांना त्याचा तोटा सहन करावा लागला आहे.

भाजप सरकारने रासायनिक खतावर लावलेल्या जीएसटीचा परिणामदेखील शेतकऱ्यांच्या शेतीवर होत आहे. १८ टक्के जीएसटी कर हा रासायनिक खतांवर लावल्यामुळे शेतकऱ्याचे गणित कोलमडून गेले आहे. केंद्राकडून वर्षाला सहाहजार रुपये शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी म्हणून दिले जातात आणि शेतकऱ्यांकडून हजारो रुपये जीएसटी च्या स्वरुपात परत वसुल केले जातात, अशी भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंढरपूर तालुक्यातील १७ गांवामध्ये राजकीय गट-तटाचे समीकरण बदलले असून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर अभिजित पाटील यांची सत्ता आल्यामुळे या गावात त्यांचा चांगलाच फरक पडलेला आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखाना ऊस उत्पादक हा अभिजित पाटील यांच्या मागे गेलेला यातून दिसून येत आहे. त्यामुळे गावांमध्ये भगीरथ भालके यांचा गट कमकुवत झालेला दिसून येत आहे.

या गावांमध्ये प्रामुख्याने अभिजीत पाटील यांचा गट आणि प्रशांत परिचारक यांचा गट असे दोनच गट प्रामुख्याने दिसून येत आहेत. एकटे अभिजित पाटील सोडले तर प्रणिती शिंदे यांच्या प्रचारासाठी या १७ गावांमध्ये कुठलाही मोठा नेता सक्रिय नाही.

या भागातील काँग्रेसचे ग्राहक सेलचे जिल्हाध्यक्ष संग्राम जाधव आणि अभिजित पाटील या दोघांवर या १७ गावांमधील प्रचाराची धुरा प्रामुख्याने त्यांच्या खांद्यावर आहे. भीमा कारखान्याचे मार्गदर्शक खासदार धनंजय महाडिक यांचा मोठा गट या १७ गावांमध्ये कार्यरत असून तसेच कित्येक वर्ष भीमाची सत्ता असणारे परिचारक यांचा देखील गट या सतरा गावात सक्रिय आहे.

दोन मोठे ताकदवान नेते असल्यामुळे या गावांमध्ये भाजपला मताधिक्य मिळणे गरजेचे आहे.

परंतु, ही निवडणूक शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेने हातात घेतली असून शेतकरी वर्ग प्रचंड प्रमाणावर सत्ताधारी भाजपवर नाराज आहे. त्यामुळे येत्या लोकसभा निवडणुकांमध्ये जनता प्रस्थापित पुढाऱ्यांचे ऐकून मते देणार की स्वत:च्या मर्जीप्रमाणे हे येत्या निवडणुकीत कळणार आहे. एकूणच पंढरपूर तालुक्यातील या १७ गावांत नेते मंडळींचा नाही तर जनतेचा निर्णय महत्वाचा ठरेल असेच एकूण वातावरण आहे. जनतेने घेतलेला निर्णय मतपेटीतून दिसू शकतो.



### भगीरथ भालकेंच्या नेतृत्वाची दिसेल ताकद

स्वर्गीय भारत भालके यांच्यामुळे या सतरा गावात सतत सुशीलकुमार शिंदे यांना मताधिक्य मिळत गेले. परंतु, भारत भालके यांचे सुपुत्र भगीरथ भालके यांना या १७ गावांमध्ये भारत भालके यांच्या सारखे वर्चस्व निर्माण करता आले नाही. त्यांनी बीआरएस या पक्षात प्रवेश केल्यामुळे त्यांचे बरेच कट्टर कार्यकर्ते त्यांच्यावर नाराज आहेत. त्यामुळे या १७ गावांमध्ये भगीरथ भालके यांची ताकद कितीपत दिसणार हे मतमोजणीतून दिसून येईल.

# मोदी विरुद्ध गांधी

## भाजपाची नवी नीती



सोलापूर : देशात सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या उत्सवाला सुरुवात झाली आहे. भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्यासाठी 'आपकी बार चारसो पारचा' नारा दिला आहे. पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा विराजमान करण्याचा चंग बांधला आहे. भाजपला महाराष्ट्रातील मिशन ४५ ला जरा अडचणी वाटत असल्यामुळे भाजपने आता नवीन प्लॅन केला आहे. ही निवडणूक मोदी विरुद्ध गांधी अशी लोकांपुढे नेण्याची त्यांची रणनीती आखली आहे. ही रणनीती सोलापुरातील सभेत खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच बोलून दाखविली. या नव्या रणनितीचा भाजपला कितीपत फायदा होणार तसेच ही रणनीती विरोधक हाणून पाडतील का? मतदार भाजपच्या नव्या खेळीचे कितीपत समर्थन करणार, हे पाहावे लागेल.

भाजपने महाराष्ट्रात कोणत्याही परिस्थितीत ४५ जागा जिंकण्याचे लक्ष ठेवले आहे. मात्र, आतापर्यंत आलेल्या अनेक सर्व्हेक्षणामध्ये हा आकडा ३० च्या पुढे जाण्यास तयार नाही. त्यामुळे भाजपने आता रणनीती बदलली आहे. भाजपने ही निवडणूक मोदी विरुद्ध गांधी अशीच करण्याचा नवी खेळी समोर आणली आहे. त्यामुळेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्येक सभेमध्ये मोदी विरुद्ध गांधी निवडणुकीचा नारा देत आहेत. विविध सर्व्हेक्षणामधून महाराष्ट्रात महायुतीला कमी जागा दाखवत असले तरी पंतप्रधान म्हणून पसंती नरेंद्र मोदी यांनाच मिळत असल्याचा दावा केला जात आहे. आतापर्यंतच्या सर्व्हेक्षणामधून पंतप्रधान मोदी यांना ६० टक्यांपेक्षा पेक्षा जास्त लोकांनी पसंती दर्शवली आहे. नेमका याचाच फायदा महाराष्ट्रात भाजपने घेण्याचे ठरवले आहे. त्यामुळेच आता महाराष्ट्रातील निवडणूक मोदी विरुद्ध गांधी करण्याचे भाजपने ठरविल्याचे दिसते. काल सोलापुरात झालेल्या महायुतीच्या उमदेवारांच्या सभेमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी ही निवडणूक सातपुते विरुद्ध शिंदे नाही किंवा निंबाळकर विरुद्ध मोहिते-पाटील नाही तर मोदी विरुद्ध राहुल गांधीच आहे त्यामुळे तुम्हाला नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बघायचे असल्यास कमळासमोरचं बटन दाबा, असे आवाहनही त्यांनी केले.

भाजपकडे पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांचा चेहरा आहे, तर विरोधकांकडेच सगळेच पंतप्रधान बनण्यास उत्सुक असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांवर टीका केली. तुम्ही कमळाचे बटन दाबले तर ते मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाईल तर हाताचे बटन दाबले तर ते मत राहुल गांधी यांना जाईल असे सांगत आता तुम्हीच मोदी की गांधी हा निर्णय घ्यावा असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. एकूणच उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या भाषणावरून भाजपने ही निवडणूक मोदी विरुद्ध गांधी करण्याचा प्लॅन केल्याचे अंदाज बांधला जात आहे.

# रोजगाराचं बघाल तरच मतं मिळतील!

रवी ढोबळे
सोलापूर

**कामगारांचे शहर, गिरणगाव, कपड्याचे महाराष्ट्रातील दोन नंबरचे मॅचेस्टर ही सगळी सोलापूरची ओळख इतिहास जमा झाली आहे. चांगल्या रोजगाराच्या संधीच्या पार्श्वभूमीवर, हे शहर आता बेरोजगारांचे झाले आहे. इथल्या सुशिक्षीत बेरोजारांचे लोंढेच्या लोंढे पुणे, मुंबई अन् बेंगलोरच्या दिशेनं जात आहेत. तरुणाई रोजगार धंद्याचं निमित्ताने परगावीच स्थायिक होत असल्यानं जुळे सोलापूरसारखा भाग केवळ सेवानिृवत्तीधारकांची वस्ती म्हणून पुढे येत आहे, घरातील कर्तेधर्ते पुरुष सगळेच परगावी आहेत, घर राखण्यासाठी वयोवृद्ध मंडळीच फक्त येथे राहातात, हे वास्तव आहे. शिक्षणानुसार रोजगाराच्या संधी मिळत नसल्याचा हा परिणाम आहे. सोलापुरात उद्योग-धंदे, आणणे, आयटी कंपन्या, टेक्सस्टाईल पार्क उभारणे या अपेक्षांची पूर्ती लोकसभेच्या उमेदवाराने करायला हवा, हा मुद्दा लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सध्या चर्चेत आहे.**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचा प्रचार तापला आहे. बंद पडलेल्या कापड गिरण्या आणि नवे उद्योग आणण्यासाठी तसेच बेरोजगार कामगारांसाठी, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याच्या विषयावर दोनही उमेदवारांनी मतदारांना अभिवचन द्यायले हवे. रोजगाराच्या अजेंडा उमेदवारांनी मांडायला हवा. शहरातील युवक आणि जाणकारांनी दैनिक 'सुराज्य'कडे व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांचा हा संपादित अंश...





सध्या बेरोजगारीचा गंभीर प्रश्न सोलापूर शहरात निर्माण झाला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सोलापुरातील तरुणांना स्थानिक रोजगार उपलब्ध होण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर नोकरीच्या टंचाईमुळे तरुणाई परप्रांतात स्थायिक होत आहे. सोलापुर हे जेष्ठ नागरिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. पाणी, सार्वजनिक वाहतूक, फुटपाथ आणि चांगले रस्ते तसेच सार्वजनिक पाळणाघरे, स्वच्छतागृहे सार्वजनिक ठिकाणी मार्केट, बाजार पेठ वगैरे हे सगळे होणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**-ॲड. सरिता मोकाशी, सामाजिक कार्यकर्त्या**



आयटी पार्क, मंद्रूप व पंढरपूर एमआयडीसी,विमानतळ या गोष्टींवर फोकस होणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवडच्या धरतीवर जुळे सोलापूर हे शहर उभे करता येईल का? यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार वाढण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. शहरातील तरुणांमधील उत्सव प्रियता ही गोष्ट नकारात्मकतेने न पाहता; पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या उत्सवांचा उपयोग होईल का? या अंगानेदेखील पाहणे आवश्यक आहे. शहरातील विविध सांस्कृतिक, औद्योगिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा कृतीगट बनवून रोजगार निर्मिती साठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी मतदारांनीच याबाबत चर्चेला सुरुवात केली पाहिजे.

**- किशोर जाधव, युवक, सोलापूर**



शहरात कोणतीच कंपनी नसल्याने शिक्षण पूर्ण झाले की मुलांना पुणे किंवा मुंबईला जाण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. कारण येथे राहून करिअर नाही. व्यवसाय करायचा म्हणले तर पाहिजे तशी सपोर्ट सिस्टिम नाही. अगोदर कापड गिरण्या सुरु होत्या. मात्र आता सर्वच बंद पडले. त्यामुळे मुले सध्या पुण्या-मुंबई कडे जात आहेत. चांगले उद्योग, कंपन्या शहरात आल्या तर बाहेर जायची कोणालाच गरज पडणार नाही. त्यामुळे उमेदवार ही युवक आहेत. युवक म्हणून युवकांकडे लक्ष दिले पाहिजे.

**-मृणालिनी अमनूर, गृहिणी, सोलापूर**



सोलापुरात नव्याने उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करावा. जेणेकरून तरुणांना काम मिळेल आणि कामासाठी शोधाशोध करण्यासाठी त्यांना आपले सोलापूर सोडून जायची गरज कधीच भासणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याकडे कार्गो विमानतळ लवकरात लवकर चालू होण्याची नितांत गरज आह. ज्यामुळे माल वाहतुकीला खूप मदत होईल आणि आपल्या सोलापुरातील प्रॉडक्ट्स आपण एक्स्पोर्ट करू शकू तसेच रोजगार निर्मितीदेखील होऊ शकेल.

**-शीतल डी पंडकर, सोलापूर**



कुणाचा विजय होईल, कोणाचा पराभव होईल हे माहित नाही. मात्र सोलापूरच्या विकासाबाबत ठामपणे बोलणारा एकही उमेदवार दिसत नाही. सोलापूरचा विकास करण्यासाठी एकाही पक्षाची इच्छा का होत नाही. सोलापूर शहरामधल्या गिरणी बंद पडल्यापासून ऐकतोय की आम्ही सोलापूरला रोजगार आणू परंतु अद्याप कोणीही रोजगार आणलेला नाही. उलट सोलापूरकरांची फसवणूक झाली आहे. सोलापूरमध्ये शिक्षण घेऊन उपजीविका भागवण्यासाठी सोलापूरच्या बाहेर जाण्याची संख्या वाढली आहे. शहरातील जुने डांबरी रस्ते काढून सिमेंटचे रस्ते केले म्हणजे शहर स्मार्ट सिटी होत नाही यासाठी सोलापूर शहरातील लोकांच्या हाताला काम पाहिजे. विकास कामांवर बोलायचे सोडून वैयक्तिक व धार्मिक मुद्यांना हात घालून मतदारांना वळवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

**-रणजित चौगुले, युवक, सोलापूर**

# एमआयएम का क्या होगा कालिया?

**सोलापूर : सोलापूर लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक आहेत. मात्र अद्याप एमआयएमची भूमिका ठरलेली नाही. त्यामुळे यंदाच्या लोकसभेत तरी एमआयएमचा पंतग उडणार की नाही याबद्दल साशंकता आहे.**



२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत एमआयएमने उमेदवार न उभा करता वंचितला पाठिंबा दिला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत केवळ शहरमध्य मतदारसंघातच एमआयएमने चांगली कामगिरी केली होती. पण एमआयमची आणि वंचितची युती तुटली. त्यामुळे यंदा सोलापूर लोकसभेला एमआयएम उमेदवार देणार की नाही, याबाबत उत्सुकता होती. सुरूवातीला एमआयएमकडून तीन जणांनी निवडणूक लढण्यासाठी उत्सुकता दाखवली. त्यानंतर मात्र अचानक मोहोळचे माजी आ. रमेश कदम यांचे पुढे आले. मात्र एमआयएमच्या काही पदाधिकाऱ्यांनी लोकसभेला एमआयएमची निवडून येण्याची ताकद नाही, उमेदवार देऊ नये अशी भूमिका घेत राजीनामे पक्षाकडे सादर केले. एमआयएमच्या उमेदवारीमुळे भाजपला फायदा होऊ शकतो, असा आरोपही त्यांनी केला. अशातच आंबडेकर जयंतीनिमित्त सोलापुरात आलेल्या रमेश कदम यांनीही एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शहराध्यक्षांनी भेट घेतली. मात्र आपला उमेदवारीचा निर्णय न झाल्याचे सांगत एमआयएमला गॅसवर ठेवले. त्यामुळे शहराध्यक्ष फारूक शाब्दी यांची अडचण झाली. शहरातील पदाधिकाऱ्यांचे ऐकायची की वरिष्ठांचा निर्णय मानायचा हा त्यांच्यापुढे प्रश्न पडला आहे. सोलापूर लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत १९ एप्रिल आहे. आता केवळ दोनच दिवस उरले आहेत. तरी अद्याप एमआयएमची भूमिका ठरलेली नाही. त्यामुळे एमआयएमचे कार्यकर्तेही संभ्रमात आहेत.

### तगड्या उमेदवाराचा शोध

पक्षाच्या वरिष्ठांकडून सोलापूरची जागा लढवण्याचा आदेश आलाच तर एमआयएमपुढे उमेदवाराचा प्रश्न आहे. रमेश कदम यांनीही एमआयएमला गॅसवर ठेवले आहे. त्यांनी जर एमआयएमकडून लढण्यास नकार दिला तर एमआयएमला तगडा उमेदवार मिळणे कठीण आहे. द्यायचा म्हणून उमेदवार दिला आणि मते कमी मिळाल्यास शाब्दी यांचे मिशन मध्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

### फार्महाऊसवर बैठक

लोकसभेला निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी रात्री शाब्दी यांच्या फार्महाऊसवर एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत काय चर्चा झाली याचा तपशील देण्यास पदाधिकाऱ्यांना मनाई करण्यात आल्याचे समजले.